महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१०-११/ № 22126** **दिनांक : 14 JUL 2010.**

## परिपत्रक क्र. १२७

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु.१९,८६,६७,०००/- (रुपये एकोणीस कोटी शहाऐंशी लाख सदुसष्ट हजार फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०९/प्र.क्र.-८२/पंरा-४ दि. ३०.०४.२०१०.
२) शासन निर्णय शुध्दीपत्रक दि.२४.५.२०१०.

---

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११९,२०,००,०००/- (रुपये एकशे एकोणीस कोटी वीस लाख फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, पैकी रक्कम रुपये १९,८६,६७,०००/- (रुपये एकोणीस कोटी शाऐंशी लाख सदुसष्ट हजार फक्त) वरील संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, सबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुर ती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१०-११) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

(सही)
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवहसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक ( निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये,
---- उचित कार्यवाहीसाठी.